श्री दिलीप नारायण बनकर तदर्थ जिल्हा न्यायाधीश-३ आणि अपर सत्र न्यायाधीश, नागपुर यांची प्रबंधक, राज्य मानवी हक्क आयोग या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन आदेश क्रमांक:- एसएचआरसी-०८१७/प्र.क्र.२०२/पोल १४
दुसरा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय
मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ०७ सप्टेंबर, २०१७

वाचा:-१.प्रबंधक,मुंबई उच्च न्यायालय यांनी मानवी हक्क आयोगास लिहिलेले पत्र क्र.अे.१२१९/९९/२८३६/२०१७ दि.५ऑगस्ट २०१७.
२.सचिव, राज्य मानवी हक्क आयोग ,मुंबई यांचे पत्र क्र. एसएचआरसी/ एडिम/ ०८/ २०१७/८०९ दि.१४.८.२०१७

कार्यालयीन आदेश

उपरोक्त १ येथील पत्रान्वये राज्य मानवी हक्क आयोग,मुंबई या कार्यालयातील प्रबंधक या रिक्त पदावर (वेतनश्रेणी रु.१४३००-४००-१८३००) श्री. दिलीप नारायण बनकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-३ आणि अपर सत्र न्यायाधीश, नागपूर यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याची शिफारस करण्यात आली आहे. त्यानुसार सदर पदावर श्री. दिलीप नारायण बनकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-३ आणि अपर सत्र न्यायाधीश, नागपुर यांची महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा) नियम १९८१ च्या परिशिष्ट दोन अन्वये विहीत केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे. सदर पदावर रुजू होण्यासाठी श्री. बनकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-३ आणि अपर सत्र न्यायाधीश, नागपुर यांना तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे.

श्री. दिलीप नारायण बनकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-३ आणि अपर सत्र न्यायाधीश यांच्या प्रतिनियुक्तीने संदर्भात खालीलप्रमाणे अटी विहीत करण्यात येत आहेत:-

१. श्री. दिलीप नारायण बनकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-३ आणि अपर सत्र न्यायाधीश, नागपुर यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी २ वर्षाचा असेल.
२. विधी व न्याय विभागास त्यांच्या सेवेची आवश्यकता वाटल्यास त्यांना हा कालावधी संपण्यापुर्वी परत बोलाविता येईल. तसेच राज्य मानवी हक्क आयोगाच्या कार्यालयातील या पदावर त्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यास किंवा श्री. बनकर यांना विधी व न्याय विभागास परत यावे असे वाटले तर अनुक्रमे राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई व श्री. बनकर यांना ३ महिन्याची नोटीस देऊन विधी व न्याय विभागास आगावू सुचना द्यावी लागेल.

३. महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित सर्वसाधारण नियमानुसार, प्रतिनियुक्तीच्या कालावधीतील त्यांचे विद्यमान वेतनश्रेणीतील वेतन, महागाई भत्ता, घरभाडे, स्थानिक पूरक भत्ता इत्यादी विनियमित करण्यात यावेत.
४. प्रतिनियुक्तीच्या कालावधीत कर्तव्यार्थ केलेल्या प्रवासाचा भत्ता, रजा, विकलांगता रजेबद्दल रजा वेतन, रजा प्रवास सवलत, वैद्यकीय सवलत इत्यादीबाबतचा खर्च राज्य मानवी हक्क आयोगास सोसावा लागेल.
५. प्रतिनियुक्तीच्या पदावर हजर होण्यासाठी नियमानुसार पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहील.
६. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा) नियम १९८१ च्या परिशिष्ट चार मध्ये विहीत केलेल्या दरानुसार राज्य मानवी हक्क आयोग यांचेकडुन रजा वेतन व निवृत्ती वेतन अंशदानाची रक्कम जमा करण्यात यावी.
७. सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी, गट विमा योजना यामधील वर्गणी त्या त्या लेखाशिर्षाखाली यथास्थिती चालु ठेवण्यात यावी.
८. संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी सुरू करावयाची झाल्यास त्यांच्या सेवा विधी व न्याय विभागाकडे प्रत्यार्पित करण्यात याव्यात. मात्र या कारवाई अंतर्गत जर त्यांना निलंबित करण्यात आले तर निलंबाधीन कालावधीत विधी व न्याय विभागाकडुन निर्वाह भत्ता अदा केला जाईल.मात्र निर्वाह भत्त्याची रक्कम राज्य मानवी हक्क आयोगाच्या कार्यालयाकडून वसूल करण्यात येईल.

हे आदेश विधी व न्यायविभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. २४१५/प्रस, विधी व न्याय विभाग/का-३, दिनांक ०१.०९.२०१७ अन्वये त्या विभागाने दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१२११२८५४९६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Uday B Kannav
Date: 2017.09.12 11:19:52 +05'30'

(उ.बा.काण्णव)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अपर मुख्य सचिव(गृह)/प्रधान सचिव(विशेष) यांचे स्वीय सहायक,
२. सचिव, राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई

३. श्री. दिलीप नारायण बनकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-३ आणि अपर सत्र न्यायाधीश, नागपूर यांना विनंती करण्यात येते की, आपण सदर पदाचा कार्यभार तात्काळ स्विकारावा.
४. प्रधान सचिव (विधी व न्याय विभाग) का-२३/का-३.
५. महाप्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
६. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा, महाराष्ट्र -१ ,मुंबई
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई
९. निवडनस्ती (पोल-१४).